## कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर
## स्थायी समिती सभा क्र.१५ सन २०२३/२४
## स्थायी समिती सभा मंगळवार, दिनांक १८/०४/२०२३

================== ◎ ◎ ◎ ◎ ◎ ◎ ==================

**कार्यवृत्तांत**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक १८.०४.२०२३ इ.रोजी दुपारी १२.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो,जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे दालनात प्रत्यक्षात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाणे आहे.

येणेप्रमाणे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक, तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी सभेस उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरवात झाली.

**सचिव :-** सर्वांना नमस्कार. नवीन आर्थिक वर्षातील कोल्हापूर जिल्हा परिषदेची प्रशासक कालावधीतील सभा आज मंगळवार दिनांक १८.०४.२०२३ इ.रोजी आयोजित केली आहे. आजच्या सभेसाठी उपस्थित असलेले जिल्हा परिषदेचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक सो, मा.अति मुख्य कार्यकारी अधिकारी सो, मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. कोल्हापूर तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करते. व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक,यांच्या मान्यतेने सभा कामकाजास सुरवात करते.

**विषय क्र.१ :-** स्थायी समिती सभा दिनांक २१/०३/२०२३ इ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे. **(सा.प्र)**

**सचिव-** सर्व खातेप्रमुखाना मागील आठवडयातच सदर सभेचा कार्यवृतांत पाठविणेत आलेला आहे. याबाबत कोणत्या विभागाची काही अडचण आहे का ?

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** कोणत्याही विभागाचा सदर कार्यवृतांता बाबत काही आक्षेप नाही असे समजून कार्यवृतांत कायम करणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १८२** **दिनांक १८-०४-२०२३**

स्थायी समिती सभा दिनांक २१/०३/२०२३ इ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली होती. सदर स्थायी समिती सभेच्या इतिवृतांचे सभागृहात वाचन करणेत येवून सर्वानुमते इतिवृत्त कायम करणेबाबतचा ठराव पारीत करणेत आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२ :-** स्थायी समिती सभा दिनांक २१/०३/२०२३ इ.रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली सदर स्थायी समिती सभेतील मंजूर ठरावांवरील कार्यालयीन तजवीज जाहीर करणे. **(सा.प्र)**

**सचिव :-** दिनांक २१/०३/२०२३ च्या स्थायी समिती सभेत झालेले ठराव सर्व संबधित विभागास पुढील कार्यवाही करिता देणेत आलेले आहेत. आणि त्यावर विभागांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

**विषय क्र.३ :-**सप्ताहामध्ये प्राप्त झालेल्या महत्वाचे शासन निर्णय परिपत्रके वाचन करणे.

**सचिव -** मा.श्रीम.सुजाता सौनिक, अति.मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील प्राप्त ईमेल अन्वये आज दि.१८/०४/२०२३ इ. रोजी संध्याकाळी ४.०० वाजता ई-ऑफीस बाबत वरिष्ठ कार्यालयातून पहिली व्ही.सी / ट्रेनिंग होणार आहे. ज्यामध्ये कार्यासनाकडून टिप्पणी तयार करुन ती पुढे त्या विभागातील संबंधीत अधिक्षक, कक्ष अधिकारी, कार्यालय प्रमुख यांच्या लॉगिंनला जाणार आहे. उदाहरणार्थ

समाजकल्याण विभागातून टिप्पणी तयार केली असेल आणि ती पुढे वित्त विभागात जाणार आहे. त्या फाईलचा प्रवास जसा जसा असेल तशी ती वरील पध्दतीने ऑनलाईनव्दारे एका विभागातून दुस-या विभागात जाणार आहे. प्रत्येक कार्यालयातील जे अधिकारी/कर्मचारी आहेत त्यांचे प्रत्येकाचे गर्व्हमेंट ईमेल आयडी तयार होणार आहेत. यामध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा खाते प्रमुख बघू शकतात की, एखादी फाईल कोणत्या विभागात किंवा दप्तरला प्रलंबित आहे ते पहाता येईल. ईमेल आयडी तयार करण्यासठी प्रत्येक विभागाने त्यांच्या कार्यालयाचा डेटा दयायचा आहे. यापूर्वी मानव संपदा मध्ये जिल्हा परिषदेने माहिती भरलेली होती तिच वापरली जाणार आहे, पण त्यामध्ये नवीन सुधारणा केली गेली आहे. जे कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत किंवा मयत झाले आहेत त्यांची माहिती अपडेट करावी लागणार आहे. याबाबत आज संध्याकाळी ४.०० वा व्ही सी व्दारे सूचना देण्यात येतील, तरी सर्व खातेप्रमुख यांनी उपस्थित रहावे.

**मा.प्रकल्प संचालक -** यापूर्वी जे गर्व्हमेंट ई-मेल आयडी काढले आहेत त्याचे काय ?

**सचिव -** जे यापूर्वी गर्व्हमेंट ई-मेल आयडी काढले आहेत ते सुरु राहणार आहेत. पण जे नवीन कर्मचारी हजर झाले आहेत त्यांचे ई-मेल आयडी काढावे लागणार आहेत.

**विषय क्र.४ :-** माहे फेब्रुवारी २०२३ ची जमा व खर्चाची प्रपत्र मंजूरीबाबत.**(वित्त)**

**उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी -** माहे फेब्रुवारी २०२३ च्या जमा व खर्चाच्या प्रपत्रांना मंजूरी बाबतचा विषय आहे. माहे फेब्रुवारी अखेर हस्तांतरण जमा तपशील रक्कम रु.९३१७९८८९०/-असून खर्च रक्कम रुपये ९१५७३०४४५/- इतका आहे. अभिकरण योजना जमा रक्कम रु.७५४२९२८/-इतकी असून खर्च रक्कम रुपये ६३३३२०६५/- इतका आहे.तसेच जि.प स्वनिधि जमा रक्कम रु.१२४६१३८५९/-इतकी असून खर्च रक्कम रु.१४५०६८७७१/- इतका आहे.तरी सदर विषयास मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** मंजूरी देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १८३** **दिनांक १८-०४-२०२३**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे फेब्रुवारी २०२३ ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करणेत आली.वित्त समितीने दिनांक ०५.०४.२०२३ ने ठराव क्र.०२ व्दारे केलेल्या शिफारशीनुसार त्यास मंजूरी देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.५ :-** जिल्हा परिषद कोल्हापूर येथे सन २०१८ मध्ये प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या व प्रतिनियुक्तीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत **(प्राथमिक शिक्षण)**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) -** जि.प.सर्वसाधारण सभा दि.०७/१२/२०१८ ठराव क्र.६१७ निलंबित करणे बाबतचा विषय होता.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** काय ठराव होता.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) -** सन २०१८ मध्ये जिल्हा परिषद, कोल्हापूर अंतर्गत ऑनलाईन पध्दतीने शिक्षकांच्या बदली प्रक्रीया राबविणेत आली. याबाबत कार्यालयाकडे ३० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर बदली झालेमुळे पती पत्नी एकत्रीकरणाने बदली होणे बाबत. स्तनदामाता, गरोदर माता, व कुमारीका महिला, रॅन्डम राऊंडने बदली झालेले, संवर्ग १ व इतर कारणास्तव अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

शासनाकडील दिनांक २८ जून २०१८ च्या पत्रान्वये रॅन्डम राऊंडने बदली झालेली झालेल्या शिक्षकांच्या ठिकाणी नव्याने शिक्षक उपलब्ध झालेनंतर त्यांना त्या ठिकाणी ठेऊन त्यांची समानीकरणाच्या

पदासह रिक्त पदे दाखवुन बदली करावी अशी अशा सुचना दिलेल्या आहेत. तसेच शासनाकडील दिनांक ३१ ऑगस्ट २०१८ च्या पत्रान्वये अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करताना सदर अतिरिक्त शिक्षकांना स्तनदा माता,गरोदर माता व रॅडम राऊडने बदली झालेने ज्याची गैरसोयीने बदली झाली आहे. अशा शिक्षंकाच्या ठिकाणी अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनाने पदस्थापना देऊन त्यांची सोईने बदली करण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच जिल्हा अंतर्गत शिक्षकांच्या आपसी बदली करणे यासंदर्भात खालील प्रवर्ग निहाय प्राधान्य क्रमानुसार जिल्हा परिषद स्तरावरती शिक्षकाच्या बदल्या करणे बाबत. सभागृहामध्ये चर्चा होऊन तसा ठराव मंजुर करणेत आला.

१) स्तनदा माता, गरोदर माता यांच्या सोईने बदल्या करणेत याव्यात.
२) रॅडम रांऊडने बदली झालेले गैरसोईतील शिक्षकांच्या सोईने बदल्या करणेत याव्यात.
३) जिल्हा अंतर्गत शिक्षकांच्या आपसी बदली केल्याने पद रिक्त राहत नाही त्यामुळे जिल्हा अंतर्गत शिक्षकांच्या आपसी बदली करणे.

वरील प्रस्तावित केलेप्रमाणे शिक्षकांच्या बदल्या करून तक्रारीचे निराकरण करणेत यावे. त्यास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** आता तुम्हाला शासनाने काय सांगितले आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) -** शासनाकडून सूचना देण्यात आलेल्या आहेत की, उपरोक्त नमूद अधिनियम अनियमितते बाबत पुणे विभागातून कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार कोल्हापूर जिल्हा परिषदने सन २०१८ मध्ये शिक्षकांच्या बदल्यांच्या संदर्भात जो ठराव क्र.६१७ दि.७/१२/२०१८ रोजी पारीत केला होता. तो ठराव अदयापी निर्लंबित करण्यात आलेला नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम २६७ (अ) च्या तरतूदीनुसार जिल्हा परिषदने केलेला एखादा ठराव विधीग्राहय / विधीसंमत नसल्यास तो निर्लंबित करणे आवश्यक व अपेक्षीत आहे. तरी या प्रकरणी नियमानुसार उचीत कार्यवाही करण्याबाबतच्या मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडून सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** ठिक आहे. नियमानुसार उचित कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.

**सचिव -** मूळात ठराव निर्लंबित करण्यासाठी एक तर त्या ठरावा नुसार कृती झालेली आहे व त्यास पाच वर्षे झाली आहेत. ठराव रद्द करावयाचा झाल्यास तो मा.विभागीय आयुक्त यांचेकडे पाठवावा लागेल. इथे स्थायी समितीला अधिकार नाही आहेत.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** आपण ठराव करुन मा.विभागीय आयुक्त यांचेकडे पाठवू.

**सचिव -** मग मूळ ठरावानुसार जी कार्यवाही केली ती पण रद्द करावी लागेल.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** ठरावानुसार काय कार्यवाही केली आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) -** ठरावानुसार बदल्या करण्याची कार्यवाही केली आहे.

**सचिव -** त्या सगळया बदल्या रद्द कराव्या लागतील. तसेच मी शिक्षण विभागाने प्रस्तावीत केलेल्या फाईलवरती असे लिहलेले होते की, पाच वर्षानंतर कार्यवाही करावयाची झाल्यास विधी तज्ञांचे मत घ्यावे असे लिहले होते.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम २६७ (अ) काय आहे.

**सचिव -** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील

कलम २६७ (अ) - **जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती इत्यादींचा विधिसंमत नसलेला आदेश किंवा ठराव यांची अंमलबजावणी निलंबित करण्याचा आयुक्तांचा अधिकार.**

१) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे अशी आयुक्तांची खात्री झाल्यास, त्यास आपल्या सहीच्या लेखी आदेशाव्दारे, एखादया जिल्हा परिषदेचा किंवा तिच्या समितीचा अथवा पंचायत समितीचा जो कोणताही आदेश किंवा ठराव किंवा तिने जी कोणतीही कृती करणे त्यांच्या मते विधिसंमत नसेल, त्या आदेशाची किंवा ठरावाची अंमलबजावणी, निलंबित करता येईल किंवा अशी कृती करण्यास मनाई करता येईल आणि अशा आदेशाचे अनुपालन करणे हे यथास्थिति, जिल्हा परिषदेचे किंवा तिच्या समितीचे अथवा पंचायत समितीचे कर्तव्य असेल.

२) जर एखादया जिल्हा परिषदेच्या किंवा तिच्या समितीच्या किंवा पंचायत समितीच्या कोणत्याही आदेशाची किंवा ठरावाची अंमलबजावणी करणे किंवा जिल्हा परिषदेने किंवा तिच्या समितीने किंवा पंचायत समितीने कोणतीही गोष्ट करणे हे कलम २६१, पोट-कलम (१) खाली दिलेल्या अनुदेशांशी किंवा काढलेल्या निदेशांशी विसंगत आहे असे आयुक्तांचे मत झाल्यास, त्यास आपल्या सहीच्या लेखी आदेशाव्दारे अशी अंमलबजावणी निलंबित करता येईल किंवा ती गोष्ट करण्यास मनाई करात येईल आणि आयुक्तांच्या आदेशाचे अनुपालन करणे हे, यथास्थिति, जिल्हा परिषदेचे किंवा तिच्या समितीचे किंवा पंचायत समितीचे कर्तव्य असेल.

त्यामुळे तो स्थायी समितीच्या कक्षेत येत नाही. तो थेट मा.विभागीय आयुक्त यांचेकडे पाठवावा लागेल.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** ठिक आहे. आपण विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठवू.

**सचिव -** जि.प.सर्वसाधारण सभेच्या कक्षेतला विषय स्थायीला कसा येईल.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** पण नेहमी आपण पहिल्यांदा स्थायी समिती मध्ये विषय घेतो, मग तो जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे ठेवतो.

**सचिव -** हो सर, पण हे विषय आपण स्थायीत घेत नाही. यापूर्वीच सर्व खातेप्रमुखांना सूचना दिलेल्या आहेत की, जे विषय स्थायीत घ्यायचे आहेत ते प्रथमता सामान्य प्रशासन विभागात दया आणि जे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेला निर्णय घेण्याचे अधिकार आहेत ते स्थायी समितीला नाहीत, कारण जि.प.सर्वसाधारण सभागृह हे सर्वोच आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -**आता निर्णय नाही घ्यायचा, सर्व समितींच्या जे विषय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेला जातात ती केलेली शिफारस मान्य/अमान्य करण्याचा जि.प.सर्वसाधरण सभेचा अधिकार आहे. आज जरी आपण स्थायी समितीमध्ये एखादी शिफारस केली. तरी जि.प.सर्वसाधारण सभेला वाटले की ते मान्य नाही किंवा त्याच्याशी असहमती दर्शवितो तर ते सर्वोच सभागृहाच्या अधिकारात आहे.

**प्रकल्प संचालक -** झालेल्या बदल्यांना मान्यता आहे का ? की तो ठराव रद्द करायचा आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** तो ठराव रद्द नाही करायचा, तर तो ठराव निलंबित करायचा आहे.

**सचिव -** ठराव निलंबित करायचा म्हणजे त्याची कार्यवाही रद्द होणार आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** निलंबन म्हणजे त्याची कार्यवाही रद्द होत नाही. निलंबन मध्ये तो भविष्यात ऑपरेटीव्ह राहत नाही.

**सचिव -** आता सर तो भविष्याचा विषयच नाही. तो तेवढयाच वर्षापूर्ता लागू होता.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** तुम्ही एखादी गोष्ट केली तर तो जुना जो निर्णय आहे त्याचा एक प्रिसिडेंट म्हणून वापर केला जातो. तर हया ठरावाचा भविष्यात कोणी प्रिसिडेंट म्हणून वापर केला जावू नये.

**सचिव -** नाही सर, त्या मलगोंडा पाटील यांच्या प्रकरणामध्ये शासन असे म्हणते आहे की, तो जो ठराव केला आहे त्यानुसार जर बदल्या झाल्या असतील तर तो ठराव निलंबित करण्यासाठी का पाठवला नाही. सन २०१८ च्या बदल्यापुर्ता तो ठराव आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** हो मान्य आहे.

**सचिव -** सन २०१८ च्या बदल्यांचा कालावधी होऊन गेला आहे, मग तो सन २०२३ ला किंवा त्यानंतर तो लागू राहणारच नाही.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम २६७ (अ) नुसार एखादा विषय किंवा प्रकरण हे थेट मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे येते किंवा थेट जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये येत नाही किंवा थेट स्थायी समिती येत नाही असे आपण कशाच्या आधारे म्हणून शकतो.

**सचिव -** सर याचे एक रजिस्टर असते जे आयुक्त कार्यालयास आपण त्रैमासिक अहवाल पाठवला जातो.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** नाही ते नकोय या अधिनियमात कुठे असा उल्लेख आहे का? की तो मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा अधिकार आहे.

**सचिव -** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा अधिकार नाही, तो फक्त मा.विभागीय आयुक्तांकडे पाठवायचा आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** हो मग आयुक्तांकडे पाठवतांना तो जिल्हा परिषदेने पाठवायचा आहे, असे कलम २६७ (अ) मध्ये सूचित केले आहे.

**सचिव -** शासनाने विचारले आहे की, जिल्हा परिषदेने सदरचा ठराव निलंबित करण्यासाठी पाठवला आहे का

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक -** ठिक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम २६७ (अ) नुसार सदरचा ठराव त्याचे परिणाम जे आहेत ते काय करायचे असे जर हा ठराव निलंबित करावा लागेल. निलंबित करण्याच्या मागची आमची भूमीका अशी आहे की, हा ठराव भविष्यामध्ये प्रिसिडेंट म्हणून वापरला जावू नये. यामध्ये शासनाने जे मार्गदर्शन दिले आहे. त्याची आम्हाला अंमलबजावणी करण्याची इच्छा आहे. कलम २६७ (अ) नुसार स्थायी मध्ये चर्चा झाली, शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सन २०१८ जो ठराव झाला तो निलंबित करण्यासाठी जे विवेकाधीन आयुक्तांना अधिकार आहेत त्यांच्याकडे पाठविण्यासाठी सदरचा विषय स्थायी समितीमध्ये शिफारस करुन येत्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा. जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर झाल्यानंतर मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. कारण याचे विभागीय चौकशीचे प्रकरण आयुक्त यांचे स्तरावर असल्याने याचा आधार त्यांना घेता येईल न येईल, तो निर्णय मा.विभागीय आयुक्त घेतील.

**ठराव क्रमांक - १८४ दिनांक १८-०४-२०२३**

मा.कक्ष अधिकारी ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रं. झेडपीए-२०२२/प्र.क्र.७१/पंरा-१ दिांक १७ ऑगष्ट २०२२ अवये जिल्हा परिषद कोल्हापूर येथे सा २०१८ मध्ये प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या व प्रतिायुक्तीमध्ये झालेल्या अनियमतेबाबत पत्र पाठवले आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद कोल्हापूरो सा २०१८ मध्ये प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या संदर्भात जो ठराव दि.७/१२/२०१८

रोजी पारित केला होता, तो अद्यापही निलंबित करण्यात आला नसल्याचे दिसून येते. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिीयम १९६१ मधील कलम २६७ अ च्या तरतुदीनुसार जिल्हा परिषदेने केलेला एखादा ठराव विधीग्राहय/विधीसंमत नसल्यास तो निलंबित करणे आवश्यक व अपेक्षित आहे. तरी सदर प्रकरणी उचित कार्यवाही करणेत यावी असे पत्रात नमूद केले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिीयम १९६१ मधील कलम २६७ (१) ुसार जिल्हा परिषदेचा कोणताही आदेश किंवा ठराव अंमलात आणल्याने किंवा जिल्हा परिषदेकडून जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात आहे किंवा करण्यात येत आहे,ती केल्याो लोकांना इजा किंवा त्रास होत आहे किंवा होण्याचा संभव आहे किंवा शांततेचा भंग होण्याचा संभव आहे. असे मत असेल तर त्यास आपल्या सहीी (जिल्हा दंडाधिका-यांचा अधिकार )लेखी आदेश काढून अशी अंमलबजावणी निलंबित करता येईल किंवा ही गोष्ट करण्यास मनाई करता येईल.

कलम २६७ (२) नुसार जिल्हा दंडाधिकारी पोट कलम (१) खालील कोणताही आदेश देईल तेव्हा तो असा आदेश का दिला या बद्दलच्या कारणाच्या निवेदनासह अशा आदेशाची एक प्रत आयुक्ताकडे आणि त्या आदेशाचा परिणाम जिच्यावर होणार असेल अशा जिल्हा परिषदेकडे किंवा पंचायत समितीकडे ताबडतोब पाठवील आणि तो आदेश विखंडीत करणे किंवा आयुक्तांना योग्य वाटेल त्या कालावधीपर्यंत तो फेरबदलासह किंवा फेरबदलावाचून अमंलात असण्याचे चालू रहावे म्हणून निदेश देणे हे आयुक्ताच्या विवेकाधिकाराधीन असेल. अशी तरतूद आहे.

तरी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ०७/१२/२०१८ मधील ठराव क्रं.६१७ निलंबीत करणेकामी सदरचा विषय जि.प.सर्वसभेसमोर ठेवणेस स्थायी समिती शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.६ :-** मौ.इस्पुर्ली ता.करवीर येथील अंगणवाडी क्रमांक - ६९ निर्लेखन करणे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत **(महिला व बालकल्याण)**

**जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक):-** मौ.इस्पुर्ली ता.करवीर येथील अंगणवाडी क्र.६९ निर्लेखन करणेबाबतचा विषय असून याबाबत अधीक्षक अभियंता सार्वजनीक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दि.११/११/२०२२ दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक -१८५** **दिनांक १८-०४-२०२३**

मौ.इस्पुर्ली ता.करवीर येथील अगणवाडी क्रमांक-६९ मिळकत क्रमांक-८१ मध्ये सन-१९९० मध्ये बांधणेत आलेली असून सदर इमारतीच्या भिंतीला तडे गेले असून ,दारे,खिडक्या निकामी झालेने अंगणवाडीत मुलांना बसणेकामी धोकादायक असलेने ती निर्लेखन करणेबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बालविकास प्रकल्प ता.करवीर०१ यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.सदर प्रस्ताव अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,कोल्हापूर यांचेकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

सदर प्रस्तावास मा.अधिक्षक अभियंता, सार्वनजिक बांधकाम मंडळ कोल्हापूर यांनी दिनांक-११/११/२०२२ ने निर्लेखन करणेबाबत शिफारस दिलेली आहे. सदर इमारत ही जिल्हा परिषदेच्या मालकीची असलेने निर्लेखन करणेस मान्यता देणेचे अधिकार सर्वसाधारण सभेचे असलेने समितीने शिफारस करणेचे सर्वानुमते ठरले.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.७ :-** मौ.खुपीरे ता.करवीर येथील अंगणवाडी क्रमांक - १६१,१६३ व १६४ मिळकत क्रमांक ५०७ निर्लेखन करणे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत **(महिला व बालकल्याण)**

**जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक):-** मौ.खुपीरे ता.करवीर येथील अंगणवाडी क्र.१६१,१६३ व १६४ इमारत निर्लेखन करणेबाबतचा विषय असून याबाबत अधीक्षक अभियंता सार्वजनीक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दि.२१/०३/२०२३ दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक -१८६** **दिनांक १८-०४-२०२३**

मौ.खुपीरे ता.करवीर येथील अगणवाडी क्रमांक-१६१,१६३ व १६४ मिळकत क्रमांक-५०७ मध्ये सन-१९८२ मध्ये बांधणेत आलेल्या असून सदर इमारती धोकादायक असलेने त्या निर्लेखन करणेबाबत उप अभियंता (बांधकाम) उपविभाग,करवीर यांनी प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रस्तावास मा.अधिक्षक अभियंता, सार्वनजिक बांधकाम मंडळ कोल्हापूर यांनी दिनांक-२१/०३/२०२३ ने निर्लेखन करणेबाबत शिफारस दिलेली आहे. सदर इमारत ही जिल्हा परिषदेच्या मालकीची असलेने निर्लेखन करणेस मान्यता देणेचे अधिकार सर्वसाधारण सभेचे असलेने समितीने शिफारस करणेचे सर्वानुमते ठरले.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.८ :-** मे.हिंदुस्थान लॅबोरेटरीज मुंबई यांनी सन २०१६-१७ विषेश घटक योजनेतील अनुसूचित जातीतील कुपोषित मुलां-मुलींसाठी अतिरिक्त आहार पुरविणे या योजनेची १०% अनामत रक्कम रु.९९,९९९/- संबंधितांना अदा करणे करिता मान्यता मिळणे बाबत. **(महिला व बालकल्याण)**

**जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक):-** १०% अनामत रक्कम रु.९९,९९९/- संबंधीतांना अदा करणेस मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १८७** **दिनांक १८-०४-२०२३**

सन २०१६-१७ मध्ये महिला व बाल कल्याण विभागामार्फत अनुसूचित जातीतील कुपोषित मुलां-मुलींसाठी अतिरिक्त आहार पुरविणे.करिता विशेष घटक योजनेतून मायक्रोन्युट्रीयन सप्लेमिंन्ट (सिरप) पुरविणे बाबत मे.हिंदुस्थान लॅबोरेटरीज मुंबई यांना र.रु.९,९९,९५०/- पुरवठा आदेश देणेत आलेला होता.

सदर पुरवठादाराची १० % अनामत रक्कम रु.९९,९९९/- प्रलंबित असून मे.हिंदुस्थान लॅबोरेटरीज मुंबई यांनी दि.१०/०१/२०२३ चे पत्रान्वये सदरची १० % अनामत रक्कम रु.९९,९९९/- रक्कम मागणी केली आहे.

सन २०१६-१७ चे स्थानिक निधी लेखा परिक्षणामध्ये परिचछेद क्रमांक ११ समाविष्ट झालेला होता. सदरचा परिच्छेद सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण कोल्हापूर यांचेकडील दिनांक २५/४/२०२२ चे पत्रान्वये वगळणेत आलेला आहे. त्यामुळे मे.हिंदुस्थान लॅबोरेटरीज मुंबई यांना सदरची

रक्कम ५ वर्षावरील प्रलंबित असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषद, ,व पं.स.लेखा संहिता १९६८ नियम २०९(७)(३) नुसार व्यपगत केलेली रक्कम या नियमाच्या २०९ (८) नुसार पुर्व मान्यतेनुसार देता येईल.असे असलेने व्यपगत झालेल्या रक्कमेस मंजूरीचे अधिकार स्थायी समितीस असलेने व महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.४१ दि.१७/०२/२०२३ अन्वये शिफारस केलेने स्थायी समिती सभा मे.हिंदुस्थान लॅबोरटरीज मुंबई यांची १० % अनामत रक्कम रु.९९,९९९/- रक्कम अदा करणेस मान्यता देत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.९ :-** प्रा आ केंद्रांना काल्पनिक कुशल व अकुशल पदांवर बाहययंत्रणेकडून मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे बाबत **(आरोग्य)**

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** प्रा आ केंद्रांसाठी बाहयत्रंणेकडून उपलब्ध करुन घ्यावयाचे काल्पनिक कुशल मनुष्यबळ करुन घेणेसाठी उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.१४/०३/२०२३ नुसार संस्थेची निवड करणेसाठी शिफारस मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १८८** **दिनांक १८-०४-२०२३**

जिल्हा परिषद कोल्हापूर आरोग्य विभाग अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांना बाहययंत्रणेकडून वाहन चालक व सफाई कामगार यांची सेवा उपलब्ध करुन घेणेत येत आहे. सदर सेवा पुरवठादार संस्थांचा करार कालावधी संपुष्टात आला आहे. तसेच नव्याने मंजूर झालेल्या ७ प्राथमिक आरोग्य केंद्र व १ उपकेंद्र या ठिकाणी काल्पनिक कुशल व अकुशल पदांवर बाहययंत्रणेकडून मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. उदयोग, उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्र.काआआ-२०१३/प्र.क्र.२३३/कामगार-८ दि.१४/०३/२०२३ अनुसार बाहययंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी सेवापुरवठादार संस्थेची / एजन्सीची निवड करणे आवश्यक आहे.

जिल्हा परिषद, कोल्हापूर अधिनस्त सध्या कार्यरत ७४ प्रा आ केंद्र व ७ नव्याने मंजूर झ ाालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी काल्पनिक कुशल व अकुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेसाठी वरील शासन निर्णयामध्ये सुचित केलेल्या सेवा पुरवठादार संस्था / एजन्सी यांचेकडून मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेबाबत सभेत चर्चा होवून, सदरचा विषय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मान्यतेकरीता ठेवणेस स्थायी समिती सभा शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१० :-** आणीबाणीच्या औषधे, जंतनाशके, गोचिड, गोमशि निमुर्लन कार्यक्रम श्वानदंश प्रतिबधक लसिकरण या योजनेस प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी मिळणे बाबत.**(पशुसंवर्धन)**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी :-** सेस मधून आणीबाणीची औषधे, जंतनाशके खरेदी करण्यास मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १८९** **दिनांक १८-०४-२०२३**

सन २०२३-२०२४ मध्ये जिल्हा परिषद स्वनिधी योजनेतुन आणिबाणीची औषधे, जंतनाशक औषधे, गोचिड, गोमाशि निमुर्लन कार्यक्रम व श्वानंदश प्रतीबंधक लसिकरण या सदरी रु.४०.०० लक्ष तरतुद

उपलब्ध आहे. सदर तरतुदीमधुन जिल्हयातील पशुधनासाठी पशुवैदयकिय दवाखान्यामध्ये वापरण्यासाठी आणिबाणीची दैनदिन वापराची औषधे, जंतनाशक औषधे, गोचिड गोमाशि फवारणी औषधे इ. विहित कार्यप्रणालीव्दारे औषधे खरेदी करुन पुरवठा करावयाची आहेत. जिल्हयातील संभाव्य पुरपरिस्थीती विचारता घेता पशुवैदयकिय संस्थांकडे अत्यावश्यक औषधे असणे आवश्यक आहे. सदर योजना राबविण्यास पशुसंवर्धन व दुधशाळा समिती सभा दि. ०३/०४/२०२३ ने मान्यता घेणेत आली आहे.

उपरोक्त योजनेवरील तरतुद र.रु.४०.०० लक्ष ला प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी देणेचे अधिकार शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१६/ प्र.क्र.५६/वित्त ९ दि.७ ऑक्टोंबर २०१७ नुसार मा. स्थायी समिती सभेचे असल्याने हि सभा र.रु.४०.०० लक्ष खर्चास प्रशासकिय व तांत्रिक मान्यता देत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.११ :-** जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारत, मा.अध्यक्ष निवासस्थान, मा. उपाध्यक्ष व मा.विषय समिती सभापती निवासस्थान, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी निवासस्थान, व कदमवाडी येथील अधिकारी, कर्मचारी निवासस्थान,चंदगड भवन,कागलकर हाऊसइमारत व पार्किग तसेच प्रशासकीय इमारत लिप्ट साठी सन २०२३-२४ या वर्षाकरिता सुरक्षा रक्षक नेमणुक करणेसाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत **(बांधकाम)**

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १९०** **दिनांक १८-०४-२०२३**

जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रशासकीय इमारत येथे ३-सुरक्षारक्षक, मा.अध्यक्ष निवासस्थान येथे ३-सुरक्षारक्षक, मा उपाध्यक्ष व विषय समिती सभापती निवासस्थान येथे ३-सुरक्षारक्षक, मा मुख्य कार्यकारी अधिकारी निवासस्थान येथे ३-सुरक्षारक्षक, व कदमवाडी येथील अधिकारी /कर्मचारी निवासस्थान येथे ३-सुरक्षारक्षक तसेच चंदगड भवन व कागलकर हाऊस परिसर यां ठिकाणी ३ सुरक्षा रक्षक याप्रमाणे एकुण १८ सुरक्षारक्षक अधिक ३ बदली सुरक्षारक्षक (रिलिव्हर) असे एकूण २१ सुरक्षारक्षक कार्यरत आहेत. सद्या मुख्य प्रशासकीय इमारत येथील लिप्ट करिता नविन १ सुरक्षा रक्षक नियुक्त करणे गरजेचे आहे.त्यामुळे सन २०२३-२०२४ या वर्षासाठी एकूण २२ सुरक्षा रक्षक नियुक्त करावे लागणार आहेत.महाराष्ट्र शासन निर्णय क्र एजीए-१५०६/प्रक्र९१/काम-५ दि ८/११/२००६ अन्वये ज्या शासकीय कार्यालयांना सुरक्षारक्षकांची आवश्यकता असेल तेव्हा त्याची मागणी खाजगी अभिकरणामधून न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडूनच नेमणूक करावी अन्यथा संबंधित जबाबदार अधिकारी हा दंडात्मक कारवाईस प्राप्त राहील असे निर्देश आहेत. त्यामुळे कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील सुरक्षारक्षक नेमणूक सहाय्यक कामगार आयुक्त व अध्यक्ष जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर यांचे मार्फत करणेत आली आहे.महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र पदनि२५१२/प्रक्र१५७/का१२ दि १९/३/२०१४ अन्वये ज्या शासकीय कार्यालयांना बाहय यंत्रणेमार्फत कंत्राटी सुरक्षारक्षक आवश्यक असल्यास त्यांनी प्रथम सुरक्षारक्षक मंडळाकडून पहारेकरी उपलब्ध करून देण्यास असमर्थ असलेचे लेखी नकार घेऊनच निवीदा प्रक्रीया राबवून बाहय यंत्रणेमार्फत पहारेकरी पदासाठी सेवा उपलब्ध करून घ्यावी असे निर्देश दिलेले आहेत. जिल्हा परिषद कोल्हापूरसाठी सुरक्षारक्षक पुरविणे बाबत देणेत आलेल्या मक्त्याची मुदत येत्या दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपली आहे.

सदरचा खर्च २५१५-८००-०२ पंचायत राज कार्यक्रम (८) २०५३ सामान्य प्रशासन -इतर सादिलवार जि.प.परिसर साठी पहारेकरी पुरविणे करिता लेबर कॉन्ट्रक्टरची (मजुर मक्तेदार)निविदा प्रक्रियेतून नेमणूक करणे व अन्य अनुषगीक खर्च जिल्हा परिषद स्वनिधी खाते क्र.४ सांकेतांक क्र १७३ या लेखाशिर्षक अंर्तगत करणेत येते. सन २०२२-२३ करिता एकुण वार्षिक रक्कम रु.५५.०० लाख इतका अंदाजित खर्च येणार आहे. सदरचा खर्च जि.प. स्वनिधीमधून करणेत यावयाचा आहे. तरी वरील विषयामध्ये नमूद केलेप्रमाणे सुरक्षा रक्षक नियुक्तीसाठी दिनांक ०१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीकरिता येणाऱ्या खर्चास ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय दि.७-१०-२०१७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारनुसार एकूण रक्कम रुपये ५५.०० लक्ष इतक्या खर्चास स्थायी समिती सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** आणखीन कोणत्या विभागाकडील विषय असलेस घ्यावेत विषय नसलेस सभा थांबवूया.

**सचिव:-** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक सो यांचे परवानगीने सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपन्न झाली.

**कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला.**

(मनीषा ए देसाई)
सचिव तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, कोल्हापूर

(संजयसिंह चव्हाण)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद,कोल्हापूर